**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुभाष भिमराव भालेराव
३५३, , शाहूनगर, उपळाई रोड, ता.बार्शी, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, बार्शी,
ता.बार्शी जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी,
ता.बार्शी जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८६९ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुभाष भिमराव भालेराव
३५३, , शाहूनगर, उपळाई रोड, ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, बार्शी, ता.बार्शी जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.बी.एन.रंगदाळ
**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
बार्शी, ता.बार्शी जि.सोलापूर श्री.बी.एन.रंगदाळ

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.६.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१४.८.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२२.७.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.६.४.२०१० |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

<u>विवेचन</u>

आपण मागितलेली माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.सुभाष भिमराव भालेराव यांनी केली.

श्री.भालेराव यांनी 'स्वातंत्र्यापासून ते आज अखेरपर्यंत' अशा स्वरूपात संपूर्ण तालुक्यातील सरकारी अधिसूचनेनुसार मोफत जमीन(शेतीसाठी) मिळविणारे मागासवर्गीय लाभार्थी यांची विस्तृत माहिती मागितली आहे. ती संकलित करून ३० दिवसात देणे शक्य नव्हते. तरीही संकलित करून व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांच्या आदेशानंतर ६१६ पानांची माहिती पावणेदान महिन्यावत अपीलकर्त्यांना समक्ष व नि:शुल्क दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.बी.एन.रंगदाळ यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्याने सरसकट व अतिव्याप्त स्वरूपाची माहिती मागितली आहे. साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागल्यास माहिती नाकारण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये आहे, याची जाणीव अपीलकर्त्यास करून देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुनिलकुमार बावधनकर
चोपडे एजन्सीज अँड कन्सल्टसीज,
हिरामण लांडे बिल्डिंग, मुंबई-पुणे रोड,
कासारवाडी, पुणे-३४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय,
पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक,**
जिल्हाधिकारी कार्यालय,
पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७७/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११/१२/२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २/०२/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १/०३/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री. सुनिलकुमार बावधनकर व श्री. प्रभु विश्वनाथ चोपडे यांनी दि. ४/१२/२००७ रोजी केलेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीबाबतचा संपूर्ण तपशील | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. सुनिलकुमार बावधनकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी

कार्यालय, पुणे यांनी दिलेला निर्णय योग्य असून तो कायम करण्यात येत आहे. सदर निर्णयानुसार जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांनी त्वरित कार्यवाही करावी.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 MAY 2010.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मारुती तुकाराम कानडे
साईनिवास गृहप्रकल्प, स.नं.५३/१/१अ/१/१, धायरी, ता.हवेली, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी पुणे यांचे कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी यांचे चिटणीस(महसूल शाखा),
जिल्हाधिकारी पुणे यांचे कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७९ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी यांचे चिटणीस(महसूल शाखा),
जिल्हाधिकारी पुणे यांचे कार्यालय, पुणे श्री.संजीव नारायण देशमुख

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२७.५.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्यानें उत्तर दिल्याची तारीख | दि.७.६.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१३.८.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.६.१०.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

बिनशेती आदेशाच्या अनुषंगाने संपूर्ण संचिकेच्या प्रतीची मागणी अपीलकर्ता श्री.मारूती तुकाराम कानडे यांनी केली होती.

सन २००८ मधील ही संचिका तेव्हा उपलब्ध होत नव्हती. त्यामुळे तसे उत्तर दिले होते. नंतर संचिका प्राप्त झाली व श्री.कानडे यांना सर्व माहिती दिली. आता संचिका तहसीलदार यांच्याकडे पाठविण्यात आली असून अतिरिक्त माहिती आवश्यक असल्यास ते तेथून प्राप्त करून घेऊ शकतात. तशी सूचना तहसीलदार, हवेली यांना दिली आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे चिटणीस(महसूल शाखा), जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालय श्री.संजीव नारायण देशमुख यांनी केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तू सोपान थिटे
पिरटाकळी, पो.तिऱ्हे, ता.मोहोळ, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८९२/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर सौ.स्वाती शेंडे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.पी.एन.दीक्षित

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.७.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.८.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.९.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२८.१०.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.दत्तू सोपान थिटे यांनी लोकशाही दिनात जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे केलेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने झालेल्या जबाबाची व अनुषंगिक कागदपत्रांची प्रत मागितली होती. शुल्क भरण्याबाबत व संचिका अवलोकनाबाबत त्यांना विहित मुदतीत रजिस्टर्ड टपालाने कळविले. परंतु त्यांनी संपर्क साधला नाही. टपालाने पाठविलेली माहिती ते घेत नसल्यामुळे पंचनामा करून त्यांना माहिती दिली. जबाब न झाल्यामुळे ते जबाबाची माहिती मागत आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.पी.एन.दीक्षित यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते पाहता अपीलकर्त्यास विहीत मुदतीत उत्तर देण्यात आले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
2 4 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक उर्सेकर
सी.टी.एस.नं.३४९, शिवाजी रोड, शुक्रवार पेठ, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आरोग्यप्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपआरोग्यप्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **१८९३** / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अशोक उर्सेकर
सी.टी.एस.नं.३४९, शिवाजी रोड, शुक्रवार पेठ, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा उपआरोग्यप्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे डॉ.डी.डी.चांदककर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.८.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.४.९.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२५.९.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२६.१०.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मूळ मालकाचे हमीपत्र घेतलेले नसताना रेस्टॉरंट / हॉटेल / खानावळ यांना महानगरपालिकेने परवाना दिला आहे का, याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा उपआरोग्यप्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दिली नाही. तसेच अशा हॉटेलांमुळे शेजाऱ्यांना / नागरिकांना त्रास होत असूनही व त्याबाबत तक्रारी करूनही संबंधितांवर कारवाई केली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. अशोक उर्सेकर यांनी केली.

रेस्टॉरंटमुळे त्रास होत असल्याच्या तक्रारी आल्यानंतर संबंधितांवर कारवाई केल्यानंतर व्यवसाय बंद केला होता. नंतर काही काळ तक्रारी नव्हत्या. आता पुन्हा त्या जागेत व्यवसाय सुरू झाला असून तक्रारी येत आहेत. मात्र अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यान्वये जागा मालकीच्या परवानगीची आवश्यकता नसते. याबाबतची माहिती अपीलकर्त्यास दिली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा उपआरोग्यप्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे डॉ.डी.डी.चांदककर यांनी नमूद केले.

उभ्य बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्याचा विषय प्रशासकीय कार्यवाहीचा असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. कार्यवाहीची माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ.बाहुबली हिरालाल शहा
हिरानंद होमिओपॅथिक क्लिनिक, रणवरे टॉवर्स सिनेमा रोड,
बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८९४ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** डॉ.बाहुबली हिरालाल शहा
हिरानंद होमिओपॅथिक क्लिनिक, रणवरे टॉवर्स सिनेमा रोड,
बारामती, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,<br>सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे | | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.७.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२७.७.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१२.८.२०९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१८.११.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

शिक्षण संस्थेने सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती आपण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये मागितल्या असता नकलांसाठी स्वतंत्र अर्ज देण्यास जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे यांनी कळविले. त्याप्रमाणे अर्ज केल्यावर नकला दिल्या. आपण मागितलेली माहिती न्यायालयीन प्रक्रियेशी संबंधित असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे यांनी आदेशात म्हटले आहे, ते योग्य नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता डॉ.बाहुबली हिरालाल शहा यांनी केले.

डॉ.शहा यांनी मागितलेल्या कागदपत्रांसाठी नकलाविषयक स्वतंत्र तरतूद असल्यामुळे तसे उत्तर दिले व त्यानी अर्ज केल्याच्या दुसऱ्या दिवशीच नकला दिल्या. सार्वजनिकरीत्या उपलब्ध असणे आवश्यक असलेले असे हे अभिलेख आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे श्री.च.आ.पाटील यांनी केले.

न्यायालयीन प्रक्रियेविषयीची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद करणे चूक आहे. असा कोणताही अपवाद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये केलेला नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
2 8 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. भिमराव जगन्नाथ गायकवाड
फ्लॅट नं.१३, विठ्ठल अपार्टमेंट, शितोळेनगर,
जुनी सांगवी, पुणे-२७ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कोषागार अधिकारी,
लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
पुणे-४११ ००१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अप्पर कोषागार अधिकारी,
लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९००/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ७.४.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. भिमराव जगन्नाथ गायकवाड
फ्लॅट नं.१३, विठ्ठल अपार्टमेंट, शितोळेनगर,
जुनी सांगवी, पुणे-२७

**अपिलीय प्राधिकारी** तथा कोषागार अधिकारी,
लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
पुणे-४११ ००१ श्री. बाळासाहेब बाबुराव थिटे

**जन माहिती अधिकारी** तथा अप्पर कोषागार अधिकारी,
लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
पुणे-४११ ००१ श्री. जी. पी. दाते

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.९.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.१०.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.११.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

भविष्य निर्वाह निधीबाबतची आपण मागितलेली माहिती २०४९ च्या रजिस्टरवरून देणे शक्य असतानाही जन माहिती अधिकारी तथा अप्पर कोषागार अधिकारी, पुणे यांनी नाकारली. अपिलीय प्राधिकारी तथा कोषागार अधिकारी, पुणे यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही. देयकांची संख्या अत्यंत मर्यादित असूनही माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. भिमराव जगन्नाथ गायकवाड यांनी केली.

अपीलकर्ता श्री. गायकवाड यांनी भविष्य निर्वाह निधीबाबतची विस्तृत माहिती विशिष्ट तक्त्यात मागितली होती. त्यांच्या मागणीच्या स्वरूपात कार्यालयात नोंदी ठेवल्या जात नाहीत. कोषागारात देयक सादर झाल्यानंतर ते पारित झाल्यावर सोबतची कागदपत्रे संबंधित कार्यालयास दिली जातात व देयके महालेखापाल, मुंबई यांच्याकडे पाठविली जातात. माहिती त्यांच्याकडून प्राप्त होऊ शकेल, असे श्री. गायकवाड यांना कळविले. संबंधित माहिती जिल्हा परिषदने त्यांना दिलेली आहे, तरीही कोषागार अधिकारी कार्यालयाकडून ते ती पुन्हा मागत आहेत. अशा प्रकारच्या नोंदीचे स्वतंत्र रजिस्टर नसल्यामुळे माहिती विशिष्ट नमुन्यात संकलित करून देणे शक्य नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अप्पर कोषागार अधिकारी, पुणे श्री. जी. पी. दाते व अपिलीय प्राधिकारी तथा कोषागार अधिकारी, पुणे श्री. बाळासाहेब बाबुराव थिटे यांनी केले. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखाचे अवलोकन करून हव्या असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती शुल्क भरून प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 31 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. संदीप विठ्ठल रोहकले
द्वारा श्री.सोमनाथ खोले
'जयपार्वतीकुंज', शेटे बंगला,
नाना भालेराव कॉलनी,
मु.पो.तळेगाव-दाभाडे (स्टेशन),
ता.मावळ, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९०१/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३/११/२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११/०१/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११/०१/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ यांनी दि.२५/०५/२००७ रोजी घेतलेल्या सुनावणीअंती पारित केलेल्या आदेशानुसार करण्यात आलेल्या कार्यवाही बाबतची माहिती | |

**<u>विवेचन</u>**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२५/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. संदीप विठ्ठल रोहकले हे अनुपस्थित होते. 'अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती-मागणी अर्जानुसार विहित मुदतीत

माहिती दिलेली आहे. तसेच अपीलकर्त्यास संपूर्ण धारिकेचे अवलोकन करण्यास कळवून देखील अपीलकर्ता श्री. रोहकले हे धारिका अवलोकन करण्यास कार्यालयात आलेले नाहीत', असे जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे श्री. सिध्दार्थ चव्हाण यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बाबासाहेब अब्दुल मुलाणी
४०४, वसंत आर्केड, फ्लॅट नं.४, आजाद
व्यायाम मंडळाचे शेजारी, खाणभाग, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्य अधिकारी,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९०४ / २००९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्य अधिकारी,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली डॉ.राम.एस.हंकारे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२३.७.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.८.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१८.८.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२३.९.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

तीन व्यवसायांना दिलेल्या परवानगीच्या संदर्भातील माहिती दिली नाही व अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांच्या आदेशानुसार संबंधित व्यावसायिकांवर कारवाई केली नाही. तक्रार देऊनही विना परवाना व्यावसायिकांविरूध्द कारवाई केली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.बाबासाहेब अब्दुल मुलाणी यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.मुलाणी यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत दिली होती. परंतु त्यांनी ती स्वीकारली नाही. त्यांची मागणी माहितीची नसून प्रशासकीय कार्यवाहीची आहे. अशी कार्यवाहीही करण्यात आली असून वेळोवेळी त्याची माहिती श्री.मुलाणी यांना दिली आहे. व्यवसायधारकांना रीतसर नोटीसा देऊन व्यवसाय बंद करण्यास भाग पाडण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांच्या निर्णयानुसार केली असून त्याला विलंब झाल्याची अपीलकर्त्याची तक्रार आहे. माहिती मुदतीत दिली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली डॉ.राम.एस.हंकारे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
24 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. भिमराव लालासाहेब लोखंडे
वखार भाग, नागोबा कट्टा, मेंढे मळ्यानजीक,
मिरज, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी, मिरज — उत्तरवादी
मिरज मंडल, जि. सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी, ढवळी,
टाऊन हॉल, मिरज, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९०५ / २००९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | ६.४.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. भिमराव लालासाहेब लोखंडे
वखार भाग, नागोबा कट्टा, मेंढे मळ्यानजीक, मिरज, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी, मिरज
मिरज मंडल, जि. सांगली श्री. टी. पी. दोरकर

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी, ढवळी,
टाऊन हॉल, मिरज, जि. सांगली श्री आर. एम. मखमल्ला

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.७.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.८.२००९ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

मृत्यूपत्रासंबंधीचा दावा न्यायालयात दाखल असताना व न्यायालयाचा स्थगिती आदेश असताना गाव कामगार तलाठ्याने जमिनीची मूळ नोंद बेकायदेशीररत्या दुरूस्त केली. ते आपल्याला साडेचार महिन्यानंतर कळले. या दुरूस्त नोंदीमुळे ७/१२ उताऱ्याच्या आधारे भावाने जमिनीवर कर्ज काढले. या संदर्भातील अनेक मुद्दयांची माहिती आपण विचारली असता दिली गेली नाही. बेकायदेशीर कारवाईमुळे आपले नुकसान होत आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. भिमराव लालासाहेब लोखंडे यांनी केली.

तहसीलदारांच्या आदेशानुसार संबंधित नोंद केली होती. तहसीलदारांनी फेरचौकशीचे आदेश दिल्यावर ७/१२ उतारा मूळ स्थितीत आणला आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, ढवळी, मिरज श्री. आर. एम. मखमल्ला व अपिलीय प्राधिकारी तथा मंडल अधिकारी, मिरज श्री. टी. पी. दोरकर यांनी केले.

अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र तशी कार्यवाही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केली आहे. तसेच अपीलकर्त्याने अनेक मुद्दयांमध्ये (उदा. मुद्दा क्र. १,२,४) खुलासेवजा विचारणा केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार ती 'माहिती' ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे

दि. 26 MAY 2010

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नरहर दिनकर खोमणे
मु.माळेवाडी, पो.दौंड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहसचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११०६/ २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नरहर दिनकर खोमणे
मु.माळेवाडी, पो.दौंड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे श्री.टी.एन.सुपे

**जन माहिती अधिकारी** तथा सहसचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे श्री.एस.एच.ढेकणे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१४.७.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२३.७.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२२.८.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.८.९.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या समकालीन कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीच्या तारखा, वेतन आदी माहिती जन माहिती अधिकारी तथा सहसचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे यांनी गोपनीयतेच्या कारणावरून न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.नरहर दिनकर खोमणे यांनी केली.

शासकीय सेवकाचे वेतन, पदोन्नती या बाबी गोपनीय मानता येणार नाहीत. त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी तथा सहसचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे यांनी योग्य ते शुल्क आकारून अपीलकर्त्यास आठ दिवसात द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहसचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे यांनी दि.२०.६.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
2 8 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ.संदीप विठ्ठल रोहकले
मु.पो.पिंपळवंडी, ता.जुन्नर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सरव्यवस्थापक,
पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक मर्यादित, ४ ब, बी.जे.रोड, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अधिकारी,
पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक मर्यादित, ४ ब, बी.जे.रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११९३ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** डॉ.श्री.संदीप विठ्ठल रोहकले
मु.पो.पिंपळवंडी, ता.जुन्नर, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अधिकारी,
पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक मर्यादित, ४ ब, बी.जे.रोड, पुणे श्री.बी.पी.मुरादे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१५.५.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.८.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्र.५६६६/२००७, जा.क्र.प्रशासन / ६७५, दि.२५.६.२००९ मध्ये दिल्याचे नमूद करून पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडील वेतनदेयके आदींबाबतची माहिती बँकेच्या प्रभारी सरव्यवस्थापकांनी नाकारली. उच्च न्यायालयाचा निर्णय काही नागरी सहकारी बँकांपुरता मर्यादीत आहे. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला राज्य व केंद्र शासन, नाबार्ड आदींचे अनुदान असून शासकीय निधीचे कर्जरूपातील वाटप आदी कामे बँक करते. त्यामुळे बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू आहे, म्हणून माहित मिळाली पाहिजे, असे प्रतिपादन अपीलकर्ता डॉ.संदीप विठ्ठल रोहकले यानी केले.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना सन १९१७ मध्ये झाली असून तिला सरकारचे अनुदान मिळत नाही. नाबार्डतर्फे मिळणारा निधी शेतकऱ्यांसाठी असून बँकेसाठी नाही. तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना पूर्वीचे मक्तेदारीचे स्थानही आता राहिलेले नाही. असे असूनही देय माहिती देण्याची बँकेची तयारी आहे. मात्र डॉ.रोहकले यांनी मागितलेली माहिती अन्य व्यक्तींच्या खात्यांबाबतची आहे. बँकिंगविषयक नियमानुसार इतर व्यक्तींच्या खात्याची अशी माहिती देता येणार नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विकास अधिकारी, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक मर्यादित, ४ ब, बी.जे.रोड, पुणे श्री.बी.पी.मुरादे यांनी केले. ते लक्षात घेता, अपीलकर्त्याच्या म्हणण्यानुसार पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला माहितीचा अधिकार

अधिनियम, २००५ लागू आहे असे गृहित धरले तरी अन्य व्यक्तींच्या खात्याची माहिती न देण्याची बँकेची भूमिका योग्य आहे. यास्तव आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
2 8 MAY 2010

माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नामदेव गोविंद घावटे
सय्यदबाबानगर शिरुर (घोडनदी),
ता.शिरुर, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक शिक्षण संचालक,
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे-१ यांचे कार्यालय,पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११९४/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०८.०४.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय, पुणे-१ श्री.सुनिल मगर<br>**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे-१ यांचे कार्यालय, पुणे-१ श्री.व.मा.गायकवाड | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१५.०९.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०७.११.२००९ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.नामदेव गोविंद घावटे यांनी विस्तृत स्वरुपाची व सरसकट माहिती मागितली आहे. कार्यालयीन साधनसामग्रीचा प्रमाणाबाहेर वापर करावा लागणार असल्यामुळे माहिती देता येणार नाही. विशिष्ट प्रकरणाची माहिती नेमकेपणाने मागितल्यास त्वरित देण्यात येईल, असे त्यांना कळविले होते. नेमक्या स्वरुपाची मागणी ते करीत नाहीत. तशी माहिती त्यांनी मागितल्यास ती देता येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे-१ यांचे कार्यालय, पुणे श्री.व.मा.गायकवाड यांनी केले. व्यापक स्वरुपाच्या माहितीची मागणी लक्षात घेता अपीलकर्त्यास आवश्यक तर अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांची मागणी लेखी नोंदवून योग्य ते शुल्क भरुन प्राप्त करुन घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्रीमती.आशा उत्तम कुंजीर
कमला नेहरु हॉस्पिटल,
मंगळवार पेठ, पुणे-११

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी,**
शिक्षण मंडळ, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-१८

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,**
प्राथमिक विद्यालय, मोहननगर, चिंचवड,
पुणे-१९

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९२२/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८/०१/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५/०३/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, प्राथमिक विद्यालय या शाळेतील शिक्षकांचे पगार पत्रक, शाळेचा वार्षिक जमाखर्च अहवाल, शिक्षकांच्या वेतन वाढीचा दिनांक, अनुदानित वर्गांची माहिती व विद्यार्थ्यांकडून स्विकारण्यात आलेले विविध शुल्क इ. विस्तृत माहिती | |

## विवेचन

'मी मागणी केलेली माहिती मला प्राप्त झालेली असून प्रत्यक्ष पडताळणी अंती माझे माहितीने समाधन झालेले आहे. माझी कोणतीही तक्रार राहिलेली नाही', असे अपीलकर्त्या श्रीमती. आशा उत्तम

कुंजीर यांचे निवेदन जन माहिती अधिकारी मुख्याध्यापिका, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, प्राथमिक विद्यालय, चिंचवड, यांनी दि.१५/१२/२००८ च्या पत्रान्वये आयोगास सादर केलेले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दशरथ रघुवीर परदेशी
भाऊ पाटील चाळ, स.नं.२४, बोपोडी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
पुणे शहर, शुक्रवार पेठ, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
पुणे शहर, शुक्रवार पेठ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९२४ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दशरथ रघुवीर परदेशी
भाऊ पाटील चाळ, स.नं.२४, बोपोडी, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
पुणे शहर, शुक्रवार पेठ, पुणे डॉ.वाय.बी.खरमारे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.६.१०.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२७.१०.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.४.११.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१२.११.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सन १९८६ मध्ये जात दाखल्यासाठी सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.दशरथ रघुवीर परदेशी यांनी केली.

संबंधित कागदपत्रे आढळत नसल्यामुळे प्रती देता येत नसल्याचे अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले. तसेच त्यांनी मागितलेली माहिती त्रयस्थ व्यक्तींच्या जात दाखल्यासंबंधीची आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पुणे शहर, शुक्रवार पेठ, पुणे श्री.डॉ.वाय.बी.खरमारे यांनी केले. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
2 8 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.कांतीलाल एकनाथ देवकर
मौ.देवकरवाडी, पो.दहिटणे, ता.दौंड,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपविभागीय अधिकारी,
बारामती उपविभाग बारामती यांचे कार्यालय,
ता.बारामती,जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** शिरस्तेदार,
उपविभागीय अधिकारी,
बारामती उपविभाग बारामती यांचे कार्यालय,
ता.बारामती,जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९२५/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०६.०४.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता**-डॉ.कैलास रामचंद्र कोल्हे<br>मु.पो.न्हावरे, ता.शिरुर, जि.पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** शिरस्तेदार,<br>उपविभागीय अधिकारी,<br>बारामती उपविभाग बारामती यांचे कार्यालय,<br>ता.बारामती,जि.पुणे श्री.जी.डी.कुंभार | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०७.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०६.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०८.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१८.१२.२००९ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.कांतीलाल एकनाथ देवकर यांच्या माहिती-मागणीच्या अर्जाला विहित मुदतीत उत्तर तयार करण्यात आले. परंतु त्या दरम्यान विधानसभा निवडणुकीचे कामकाज चालू असल्यामुळे सदरचे उत्तर प्रत्यक्ष टपालाद्वारे एक आठवड्यानंतर पाठविले गेले. विलंब झाला असल्यामुळे माहिती नि:शुल्क दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार,उपविभागीय अधिकारी, बारामती उपविभाग, बारामती यांचे कार्यालय,ता.बारामती,पुणे श्री.जी.डी.कुंभार यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार,उपविभागीय अधिकारी, बारामती उपविभाग, बारामती यांचे कार्यालय, ता.बारामती,पुणे यांनी मूळ अर्जाला ३० दिवसांच्या विहित मुदतीच्या अखेरच्या दिवशी उत्तर तयार केलेले आहे. ही कृती योग्य नाही. मूळ अर्जावरील उत्तर ३० दिवसांच्या आत मुदतीअखेरपर्यंत थांबता कामा नये, याची समज जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार,उपविभागीय अधिकारी, बारामती उपविभाग बारामती यांचे कार्यालय,ता.बारामती,पुणे श्री.जी.डी.कुंभार यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुखदेव हरिश्चंद्र जाधव
८०६, शिवाजीनगर, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
भवन रचना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
भवन रचना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९३३ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुखदेव हरिश्चंद्र जाधव
८०६, शिवाजीनगर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
भवन रचना विभाग, पुणे महानगरपालिका,पुणे तत्कालीन-श्री.नामदेव नथूजी बारापात्रे

| | | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,<br>भवन रचना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे तत्कालीन-श्री.नामदेव देवराम गांभिरे | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.८.१०.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२७.१०.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३१.१०.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२०.११.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) यांच्या कार्यालयाच्या दुरूस्ती व सुशोभीकरणात फर्निचरवर झालेल्या खर्चाबाबतची माहिती न देता एकत्रित स्वरूपाची, दिशाभूल करणारी व अपूर्ण माहिती दिली. वर्तमानपत्रात या कामाबाबत दिलेल्या निविदा जाहिरातींच्या व कात्रणांच्या प्रतीबाबतही कायद्यानुसार योग्य कार्यवाही झाल्याची माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सुखदेव हरिश्चंद्र जाधव यांनी केली.

महापालिकेकडील दुरूस्ती / सुशोभीकरण कामासाठी निविदा वृत्तपत्रात प्रसिध्द केल्या जातात. अशा जाहिराती ज्या ज्या वृत्तपत्रांमध्ये आल्या त्यांच्या प्रती अपीलकर्त्यास दिल्या. निविदा विभागामार्फत या जाहिराती जनसंपर्क कार्यालयाद्वारे पाठविल्या जातात. त्या कार्यालयाकडून प्राप्त झालेली संपूर्ण माहिती व त्या व्यतिरिक्तचीही सर्व माहिती अपीलकर्त्यास दिली आहे. त्यामुळे एकत्रित निविदांमध्ये सर्व कामांचा समावेश असतो, फर्निचरची अशी स्वतंत्र माहिती नाही. असे

प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, भवन रचना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.ना.दे.गांभिरे यांनी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) एकत्रित निविदांमध्ये फर्निचरसह सर्व कामांचा समावेश असतो, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, भवन रचना विभाग, पुणे महानगरपालिका,, पुणे यांनी अपीलकर्त्यास लेखी द्यावे. तसेच अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) यांच्या कार्यालयाच्या सुशोभीकरणावर झालेल्या नेमक्या खर्चाची माहिती एकत्रित माहितीतून स्वतंत्रपणे संकलित करून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास द्यावी व अनुपालन अहवाल दि.२०.६.२०१० पर्यंत आयोगास सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दैवान गोवर्धन जाधवर
वालवड, पो.चारे, ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, बार्शी,
ता.बार्शी जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी,
ता.बार्शी जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९३८ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, बार्शी, ता.बार्शी जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.बी.एन.रंगदाळ

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
बार्शी, ता.बार्शी जि.सोलापूर श्री.बी.एन.रंगदाळ

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.९.९.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.१०.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.दैवान गोवर्धन जाधवर यांनी मागितलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी विहित मुदतीत पाठविली असल्याचे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.बी.एन.रंगदाळ यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**28 MAY 2010**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

**अपीलकर्ता**

श्री. रमेश केशवराव वानखडे
अे-१३/३०३, प्लॅनेट मिलेनियम,
४९१, एलफिस्टन रोड, पिंपळे सौदागर,
खडकी, पुणे-३

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य,**
टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय,
४९१, एलफिस्टन रोड, खडकी,
पुणे-३

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय,
४९१, एलफिस्टन रोड, खडकी,
पुणे-३

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९४१/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४/०१/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५/०३/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** प्रा.अर्जुन हरिभाऊ मुसमाडे यांना वरिष्ठ वेतन श्रेणी मिळण्यासाठी सह संचालक उच्च शिक्षण, पुणे विभाग यांच्याकडे महाविद्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावाची छायाप्रत व तदनुषंगिक एकूण १५ मुद्दे | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२५/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अपीलकर्ता श्री. रमेश केशवराव वानखडे यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांपैकी महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छायाप्रतीस शुल्क देण्याची तयारी जन माहिती अधिकारी, टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय, पुणे यांनी दर्शविली आहे. तथापि अपीलकर्त्याने माहिती स्विकारण्यास नकार दिला आहे', असे जन माहिती अधिकारी, टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय, पुणे श्री.बी.पी.पुराणिक यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. हरिदास एकनाथ गळवे
मु.मापटेमळा, पो. व ता.आटपाडी,
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अध्यक्ष,**
ग्रंथालय संचालनालय, श्री सिध्दनाथ वाचनालय,
मापटेमळा, ता.आटपाडी, जि.सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा श्री सिध्दनाथ वाचनालय,**
मापटेमळा, ता.आटपाडी, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९४७/२००९/सांगली<br>६८२/२०१०/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९/०१/२००९, ७/०८/२००९, १६/०४/२००९, १६/०५/२००९, १६/१/२०१०, १५/१२/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३/०५/२००९, |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७/०८/२००९, १७/०२/२०१०, |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५/०८/२००९, १६/०२/२००९, |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री सिध्दनाथ वाचनालय, मापटेमळा, ता.आटपाडी, जि.सांगली या संस्थेतील कर्मचारी वर्ग, शासकीय अनुदान, नियमावली इ. माहिती | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. हरिदास एकनाथ गळवे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.६/०४/२०१० रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'श्री सिध्दनाथ वाचनालय, मापटेमळा,

ता.आटपाडी, जि.सांगली या संस्थेकडून मला दि.२४/०३/२०१० रोजी कागदपत्रांच्या प्रती मिळाल्या आहेत. तरी सदर प्रकरण निकाली काढण्यात यावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.गळवे यांनी दि. ३/०४/२०१० रोजी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :-
28 MAY 2010